**महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,**
**समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**
**नामपूर ता. बागलाण जि. नाशिक**




**शैक्षणिक वर्ष २०२२ -२३**

**अर्थशास्त्र विभाग व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने**

**विषय :- 'संशोधन पद्धती' (Research Methodology)**

**दि. १६ जानेवारी २०२३**

**सेमिनार अहवाल**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपुर येथील आयक्यूएससी आणि अर्थशास्त्र विभाग आयोजित **'संशोधन पद्धती'** या विषयावरील एक दिवसीय सेमिनार संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरूडे, प्रमुख वक्ते व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. डी. एन. सोनवणे, अर्थशास्त्र विभागप्रमुख मसगा महाविद्यालयाचे डॉ. बी. एम. सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. एम. डी. अहिरे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. डी. एन. सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात संशोधन पद्धतीतील बारकावे सांगताना वस्तुस्थितीच्या आधारे सत्य जाणून घेण्यासाठी संशोधक दृष्टिकोन विद्यार्थ्यांनी बाळगावा, असे आवाहन केले. संशोधन कार्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित होत जातो. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्याला नवा दृष्टिकोन मिळतो, असेही सांगितले.

प्रमुख वक्ते डॉ. बी. एम. सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना संशोधनाचे टप्पे सांगताना संशोधकाची भुमिका तटस्थ असली पाहिजे. यामुळे तज्ञ संशोधक घडतात. असे सांगितले.

समाजातले मूलभूत प्रश्न समजून घेण्यासाठी संशोधन कार्य आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरुडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना चांगला संशोधक होण्यासाठी संदर्भ पुस्तक वाचण्याचे आवाहन केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक पद्धतीला सामोरे जाताना संशोधनाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आय.क्यू.ए.सी. विभागाचे प्रा. एम. आर. क्षीरसागर यांनी संशोधनाचे महत्त्व विशद केले.

"संशोधन पद्धती" या विषयावर परीक्षेलाही विद्यार्थ्यांना सामोरे जायचे आहे, त्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे, असे सांगितले. तसेच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रमांची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सागर रौंदळ व आभार प्रदर्शन प्रा. के. के. बच्छाव यांनी केले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी प्रा. हर्शल बच्छाव, प्रा. राकेश पगार, प्रा. सुरेश चव्हाण, प्रा. सुनील वसावे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते

(प्रा. एम. आर. क्षीरसागर)

News:- दैनिक दिव्यामराठी दि. १७/०१/२०२३

# विद्यार्थ्यांनी संशोधक दृष्टिकोन बाळगावा

## डॉ.डी.एन. सोनवणे यांचे आवाहन

**प्रतिनिधी** | नामपूर



येथील समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयक्यूएससी व अर्थशास्त्र विभाग आयोजित \'संशोधन पद्धती' या विषयावरील एक दिवसीय सेमिनार पार पडला. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरूडे, प्रमुख वक्ते व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. डी. एन. सोनवणे, अर्थशास्त्र विभागप्रमुख मसगा महाविद्यालयाचे डॉ. बी. एम. सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. एम. डी. अहिरे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. डी. एन. सोनवणे यांनी वस्तुस्थितीच्या आधारे सत्य जाणून घेण्यासाठी संशोधक दृष्टिकोन विद्यार्थ्यांनी बाळगावा, असे आवाहन केले. संशोधन कार्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित होत जातो. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्याला नवा दृष्टिकोन मिळतो, असेही सांगितले.

प्रमुख वक्ते डॉ. बी. एम. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाचे टप्पे सांगताना संशोधकाची भूमिका तटस्थ असली पाहिजे. यामुळे तज्ञ संशोधक घडतात, असे सांगितले. समाजातील मूलभूत प्रश्न समजून घेण्यासाठी संशोधन कार्य आवश्यक आहे, असेही सांगितले.

अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी.एफ. शिरुडे यांनी विद्यार्थ्यांना चांगला संशोधक होण्यासाठी संदर्भ पुस्तक वाचण्याचे आवाहन केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक पद्धतीला सामोरे जाताना संशोधनाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आय.क्यू.ए.सी. विभागाचे प्रा. एम.आर. क्षीरसागर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सागर रौंदळ केले. तर प्रा. के. के. बच्छाव यांनी आभार मानले. तर कार्यक्रमासाठी प्रा. राकेश पगार यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

News :- दैनिक पुढारी दि. १७/०१/२०२३




नामपूर : येथील समाजश्री प्रशांतदादा हिरे महाविद्यालयात संशोधन पद्धती या विषयावर बोलताना डॉ. डी. एन. सोनवणे.

# संशोधक दृष्टिकोन बाळगा : डॉ. सोनवणे

■ **नामपूर महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा**


**नामपूर : पुढारी वृत्तसेवा**

येथील समाजश्री प्रशांतदादा हिरे महाविद्यालयात आयक्यूएससी आणि अर्थशास्त्र विभागाच्या वतीने संशोधन पद्धती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रमुख वक्ते व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. डी. एन. सोनवणे यांनी संशोधन पद्धतीतील बारकावे सांगताना वस्तुस्थितीच्या आधारे सत्य जाणून घेण्यासाठी संशोधक दृष्टिकोन बाळगावा, असे आवाहन केले. संशोधन कार्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित होत जातो. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्याला नवा दृष्टिकोन मिळतो, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. एफ. शिरुडे होते. डॉ. सोनवणे यांनी संशोधनाचे टप्पे सांगताना समाजातले मूलभूत प्रश्न समजून घेण्यासाठी संशोधनकार्य आवश्यक आहे, तेव्हा संशोधकाने तटस्थ भूमिका ठेवावी, असा सल्ला दिला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिरुडे यांनी विद्यार्थ्यांना चांगला संशोधक होण्यासाठी संदर्भ पुस्तक वाचण्याचे आवाहन केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक पद्धतीला सामोरे जाताना संशोधनाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे सांगितले.

आय.क्यू.ए.सी. विभागाचे प्रा. एम. आर. क्षीरसागर यांनी संशोधनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी 'मसगा'चे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. एम. डी. अहिरे, प्रा. सागर रौंदळ, प्रा. के. के. बच्छाव, प्रा. राकेश पगार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.




एक दिवसीय सेमिनार
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
(IQAC)
GPS Map Camera
Kakadgaon, Maharashtra, India
P8CH+J5R, Kakadgaon, Maharashtra
423204, India
Lat 20.721988°
Long 74.32807°
16/01/23 11:13 AM GMT +05:30
Google


एक दिवसीय सेमिनार
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
(IQAC)


एक दिवसीय सेमिनार
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
(IQAC)
GPS Map Camera
Kakadgaon, Maharashtra, India
P8CH+J5R, Kakadgaon, Maharashtra
423204, India
Lat 20.722015°
Long 74.328057°
16/01/23 11:04 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kakadgaon, Maharashtra, India
P8CH+J5R, Kakadgaon, Maharashtra
423204, India
Lat 20.722031°
Long 74.328101°
16/01/23 11:41 AM GMT +05:30
Google


एस.पी.एच.कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपूर
IQAC आणि अर्थशास्त्र विभाग आयोजित
दिनांक. १६.जाने.२३
एक दिवशीय सेमिनार
विषय: संशोधन पद्धती (Research Methodology)
अध्यक्ष: मा.प्राचार्य डॉ.दिनेश शिरुडे
Mahatma Gandhi Vidyamandir's
Samajshree Prashantdada Hiray
Arts, Science And Commerce College, Nampur
NAAC Accredited with 'B' Grade
(Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune)
ID No. PU/NSASC/028(1984)
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL
(IQAC)
GPS Map Camera
Kakadgaon, Maharashtra, India
P8CH+J5R, Kakadgaon, Maharashtra
423204, India
Lat 20.722026°
Long 74.328088°
16/01/23 12:04 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kakadgaon, Maharashtra, India
P8CH+J5R, Kakadgaon, Maharashtra
423204, India
Lat 20.722028°
Long 74.328111°
16/01/23 10:56 AM GMT +05:30
Google